## प्रेसनोट ता. ०४/०३/२०१९

# पिस्तुल बाळगणाऱ्या कुख्यात दरोडेखोरास विमानतळ पोलीसांकडुन अटक.

पुणे शहरामध्ये वाढत्या गुन्हेगारीस आळा घालण्याकरीता हत्यार बाळगणारे गुन्हेगारांवर कारवाई करणेबाबत मा. पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे आदेश झाल्याने, श्री राजेंद्र पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर व श्री बळवंत मांडगे पोलीस निरीक्षक गुन्हे यांचे मुखजल आदेशाने विमानतळ पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना लोहगाव येथील ॲमेझॉन गोडाऊनवर सशस्त्र दरोडा घालणारा तसेच वेगवेगळ्या घरफोड्या, जबरी चोरी व वाहन चोरी या गुन्ह्यात पोलीसांना पाहीजे असलेला व पोलीसांना वारंवार गुंगारा देवुन पसार होणारा आरोपी नामे आकाश गणपत माने, वय २२ वर्षे, रा. मु.पो. शिनोली स्टेशन रेठरे, ता. कराड, जि. सातारा हा पुणे अहमदनगर रोड येथे येणार असल्याची खात्रीशीर बातमी तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक पिंगळे यांना मिळाली, त्याप्रमाणे पोलीस कर्मचारी पुष्पेंद्र चव्हाण, विशाल गाडे, प्रशांत कापुरे, विनोद महाजन यांनी सापळा रचुन त्यास ताब्यात घेतले त्याचेकडुन एक गावठी पिस्टल, दोन जिवंत काडतुस व एक चोरीची पल्सर मो.सा. जप्त करण्यात आली आहेत. त्याबाबत विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे गु.र.नं. १०८/२०१९, भा.ह.का.कलम ३, २५, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्यावर विमानतळ पो.स्टे. कडील १) गु.र.नं. ८३/२०१९, भा.दं.वि. कलम ३७९, २) गु.र.नं. २८१/२०१८, भा.दं.वि. कलम ३९४, ३) गु.र.नं. ३४३/२०१८, भा.दं.वि. कलम ३९५, तसेच लोणीकंद पो.स्टे. ४) गु.र.नं. ११८२/२०१८, भा.दं.वि. कलम ३२४, ३४, तसेच घरफोडी, व मारामारीचे या गुन्ह्यामध्ये पाहिजे असलेला आरोपी याच्याकडुन एकुण ०७ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व विभाग, मा. श्री. प्रसाद अक्कानवरु, पोलीस उपायुक्त परि. ०४ पुणे शहर, श्री शिवाजी पवार, सहा.पोलीस आयुक्त, येरवडा विभाग पुणे शहर, यांचे आदेशावरुन श्री राजेंद्र पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक व श्री बळवंत मांडगे पोलीस निरीक्षक गुन्हे विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आनंदराव पिंगळे व तपास पथकातील पुष्पेंद्र चव्हाण, प्रशांत कापुरे, विशाल गाडे, विश्वनाथ गोणे, संजय आढारी, विनोद महाजन, वसिम सय्यद, अजय विधाते, यांनी केली आहे.


विमानतळ पोलीस स्टेशन
रामवाडी, पुणे -१४.
फोन नं.०२०-२६६३३८८८